# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 31.01.2025** **वार-शुक्रवार**

---

**<u>मराठी भाषा</u>**

कृत्रिम बुध्दीमत्तेसारख्या तंत्रज्ञानाला न घाबरता त्या तंत्रज्ञानाचा उपयोग मराठी भाषेचा विकास आणि समृध्दीसाठी कसा करता येईल, यादृष्टीने विचार करावा लागेल असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. राज्य शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे आयोजित तिसऱ्या विश्व मराठी संमेलनाचं उद्घाटन आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. मराठी भाषा विभागाने स्मॉल लँग्वेज मॉडेलव्दारे महाराष्ट्रातील साहित्यिकांचे साहित्य जतन करावं असंही फडणवीस यावेळी म्हणाले.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर पुण्यात हे विश्व मराठी संमेलन पुण्यात होत असल्यानं हा भाग्ययोग असून आम्ही मराठी भाषेची सेवा कार्यकर्त्याच्या भावनेतून करत असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. मराठी माणसाने आपल्या कार्य कर्तृत्वाचा झेंडा देशाबाहेरदेखील रोवलेला असल्याचं सांगत नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, कोकणात आणि पुढे परदेशात देखील हे संमेलन आयोजित केलं जावं असं उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले.

यावेळी मराठी भाषा मंत्री उदय सामंत म्हणाले की, पुस्तकांचे गाव या संकल्पनेला आम्ही पुन्हा चालना देण्यासाठी मालगुंड हे गाव पुस्तकांचं गाव म्हणून विकसित करणार आहोत. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांना पहिला साहित्यभूषण पुरस्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. उद्घाटन सोहळ्यापूर्वी बालगंधर्व रंगमंदिरा पासून फर्ग्युसन महाविद्यलयापर्यंत शोभायात्रा काढण्यात आली होती. उद्घाटन सोहळ्यानंतर मधु मंगेश कर्णिक यांच्या उपस्थितीत 'माझी मराठी भाषा अभिजात झाली', 'मराठी भाषा आणि प्रसार माध्यमे' या विषयावरील परिसंवादात माध्यमकर्मी सहभागी झाले होते. यानंतर निमंत्रितांचे कवी संमेलन आणि अन्य देशातील मराठी जनांचा सहभाग असलेला 'मराठीचा झेंडा अटकेपार' हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला.

**<u>पुणे महामेट्रो</u>**

पुणे जिल्ह्यातील वाढती लोकसंख्या आणि रोजगारांची संख्या लक्षात घेऊन सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये वाढ करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने महामेट्रोकडून सादर पुढील 30 वर्षाच्या 1 लाख 23 हजार 489 कोटी रुपयांच्या सर्वसमावेशक वाहतूक आराखड्यामध्ये काही बदल, सूचना असल्यास सर्व लोकप्रतिनिधींनी येत्या 7 ते 10 दिवसांमध्ये महामेट्रोला लेखी स्वरुपात कळवाव्यात अशा सूचना उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री अजित पवार यांनी दिल्या आहेत. ते आज विभागीय आयुक्त कार्यालयात पुणे शहरातील वाहतूक आराखडा अद्ययावत करणे आणि पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यासंदर्भात आयोजित आढावा बैठकीत बोलत होते. असं हिंदुस्थान समाचार या वृत्तसंस्थेनं आपल्या बातमीत म्हटलं आहे.

**बनवाट संदेश**

पिंपरी चिंचवड शहरात थकीत पाणीपट्टी भरण्याविषयी नागरिकांना बनावट संदेश येत आहेत. या संदेशात असलेली लिंक डाऊनलोड करण्याविषयी सूचना देण्यात येत आहे. अशा स्वरूपाचे कुठलेही संदेश पाठवत नसल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तरी अशा संदेशांकडे दुर्लक्ष करण्याचं आणि पाणीपट्टीबाबत कोणत्याही प्रकारच्या शंका असल्यास महानगरपालिकेच्या 88 88 00 66 66 या मदतवाहिनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन पालिका प्रशासनाने केले आहे.

**जीबीएस मृत्यू**

पुण्यात जीबीएस रुग्णाची संख्या 130 झाली असून त्यापैकी 20 जण जीवरक्षक प्रणालीवर उपचार घेत आहेत. या आजारामुळे 65 वर्षीय महिलेचा ससून रुग्णालयात मृत्यू झाला आहे. पुण्यातील हा तिसरा बळी असून, राज्यातील हा चौथा मृत्यू आहे. पुण्यातील नांदेडगावात अनेक रुग्ण या आजाराने ग्रस्त आहेत. आरोग्य विभागाने नागरिकांना घाबरू नये, पण आवश्यक ती खबरदारी घेण्याचा सल्ला दिला आहे.

**बैठक**

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्यावतीने पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय क्षेत्रामधील सांख्यिकी माहितीतील सुधारणेसाठी निर्देश देणा-या समितीच्या दोन दिवसीय वार्षिक बैठकीचा समारोप आज पुण्यात झाला. या बैठकीनुसार अर्थव्यवस्थेतील माहिती निर्देशकांमधील त्रुटी शोधून त्यावर उपाययोजना करण्यात येणार आहेत.

**संमेलन**

दिल्ली इथं होत असलेल्या 98व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेनलनाच्या निमित्ताने सरहद संस्थेनं काल पुण्यात कात्रज इथं डॉक्टरांचं साहित्य संमेलन आयोजित केलं होतं. व्यक्तीच्या अंतरंगात डोकावण्याचं काम डॉक्टर करत असतात, रुग्णाच्या कुटुंबियांशीही त्यांचं नातं जोडलं जातं, या भावसंबंधातून डॉक्टरच्या मनात कथाबीज फुलावं\ अशी अपेक्षा आय. एम. ए. चे महाराष्ट्र प्रमुख डॉ. अविनाश भोंडवे यांनी यावेळी व्यक्त केली.

**क्रिकेट**

पुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या गहूंजे इथल्या मैदानावर भारत आणि इंग्लंड यांच्यात आज पाच सामन्यांच्या मालिकेतील वीस षटकांचा चौथा सामना खेळला जाणार आहे. संध्याकाळी सात वाजता हा सामना सुरू होणार आहे. मालिकेतील पहिले दोन सामने भारताने जिंकले असून तिसरा सामना इंग्लंडने जिंकला आहे.

**हवामान**

पुणे शहर आणि परिसरात आज कमाल तापमान 34 दशांश अंश तर किमान तापमान 15 पूर्णांक 8 दशांश अंश सेल्सिअस नोंद्वलं गेलं. उद्या आकाश निरभ्र राहून संध्याकाळी अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता असल्याचं पुणे वेधशाळेनं म्हटलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**